# श्री गणेशाची भजने

मंगलमूर्ति माझे आई, मजला ठाव द्यावा पायी ॥१॥
सिद्धिबुद्धि मयुरामाई, मजल ठाव द्यावा पायी ॥२॥
श्रीगजानन जय गजानन, जय गजानन मोरया ॥३॥
श्रीगणनाथ जय गणनाथ। मी अपराधी घ्या पदरांत ॥४॥
श्री गजानन पद सेवावे, काया वाजा मनोभावे ॥५॥
हेरंबमाया दाखवि पाय, तुजविण गमना करू मी काय ॥६॥
गजानना, गजानन, पार्वतीच्या नंदना मोरया गजानना ॥७॥
धावत ये बा गणराया, दीनाते मज ताराया ॥८॥
पायी हळूहळू चाला, मुखाने गजनन बोला ॥९॥
ज्याला म्हणती पुत्र शिवाचा, तो हा गणपती मित्र जिवाचा ॥१०॥
मोरया रे बाप्पा मोरया रे, मोरया बाप्पा मोरया रे ॥११॥
गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लौकर या ॥१२॥